जा.क्र. काउआ/आस्थापना/ ९५४९
कामगार उप आयुक्त, यांचे कार्यालय,
बंगला नं. ५, पुणे मुंबई रस्ता,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दिनांक१९/०३/२०२०.
Emai Id - dyclpune@gmail.com

# :: परिपत्रक ::

**विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेकरीता उपाय योजना.**

संदर्भ :- १. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)
यांचेकडील परिपत्रक क्रमांक- आव्यप्रकक्ष/कावि/१२२/२०२०
दिनांक १५/०३/२०२०.
२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)
यांचेकडील आदेश क्रमांक- जि.आ.व्य्/कावि/१३८/२०२० दि.१८/०३/२०२०

उपरोक्त विषयी अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय आदेशाव्दारे मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा पुणे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेवावत तात्काळ नियंत्रण करणेकरीता गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव करणे, सार्वजनिक संपर्क टाळणे इत्यादी वावी अत्यावश्यक् असलेबाबत कळविले आहे. तसेच सदर आदेशामध्ये ज्या आस्थापना/ कारखाने यांना कर्मचारी / अधिका-यांना Work Form Home बाबतचा पर्याय देणे शक्य आहे त्यांनी तशी व्यवस्था करुन कामाच्या ठिकाणी गर्दी टाळणेबाबत प्रयत्न करावेत असेही आवाहन केले आहे.

संदर्भ क्रमांक-१ च्या परिपत्रकामध्ये व संदर्भ क्रमांक-२ च्या आदेशामध्ये **IT/Software/ Information Technology Enabled Services** या आस्थापनेमध्ये कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना निवासस्थानातून कार्यालयीन कामे करणेबाबतची परवानगी देणेबाबतचा निर्णय घेण्याबाबत सूचना केलेल्या आहेत व आवश्यक् कामकाजाकरीता कर्मचारी/ अधिकारी यांच्या उपस्थितीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास सूचित करणेबाबत निदेश दिलेले आहेत.

सबब, **IT/Software/ Information Technology Enabled Services** या क्षेत्रातील सर्व आस्थापनांना आवाहन करण्यात येते की, मा. जिल्हादंडाधिकारी यांचे उक्त् आदेशाचे पालन करावे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कामगार उप आयुक्त,
पुणे जिल्हा, पुणे.

सोबत- संदर्भिय परिपत्रक व आदेश.

प्रति,

व्यवस्थापक,

-----------------------------------

-----------------------------------

Dycl-४५७/१९३२०२०

Scanned with CamScanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दूरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा :-** १) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसूचना क्र.करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दिनांक 13 मार्च 2020.

२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसूचना क्र.करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दिनांक 14 मार्च 2020 अन्वये " महाराष्ट्र कोव्हिड 19 उपाययोजना, नियम 2020.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.आव्यप्रकक्ष/कावि/ 122 /2020.
पुणे, दिनांक :- 15 /03/2020.

**परिपत्रक**

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भीय १ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३, व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणी साठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

त्याअर्थी, करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातील सर्व उद्योग आस्थापनांना सूचित करणेत येत आहे कि, ज्या उद्योग आस्थापनांमध्ये जसे **IT./Software/ Information Technology Enabled Services,** सेवा आणि इतर उद्योग क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांना निवासस्थानातून त्यांचे कार्यालयीन कामे करता येणे शक्य आहे आणि त्यामुळे संबंधित उद्योग आस्थापनेच्या उत्पादन, सेवा आणि दैनंदिन कामकाजावर काहीएक परिणाम होणार नसेल तर अश्या उद्योग आस्थापनांना याद्वारे जाहिर आवाहन करणेत येत आहे कि, त्यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक 31/3/2020 पर्यंत त्यांचे निवासस्थानातून कार्यालयीन कामे करण्याबाबत परवानगी देणेसाठी आपलेस्तरावरून योग्य तो निर्णय तात्काळ घ्यावा.

जिल्हाधिकारी
पुणे

( नवल किशोर राम )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१. सर्व विभागप्रमुख, ------------------, जिल्हा पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी.
२. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ---------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.
३. सर्व तालुका दंडाधिकारी, --------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.

प्रत :- १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

*******************************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कावि/ 138 /2020.
पुणे, दिनांक :- 98 /03/2020.

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेकरिता उपाय योजना

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत .असे प्रवासी पुणे जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, **मी नवल किशोर राम ,अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे खालीलप्रमाणे पुढील आदेश होईपर्यत बंदी लागू करीत आहे.**

**१. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे समारंभ, सांस्कृतिक व धार्मीक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा ,मनोरंजनाचे कार्यक्रम , क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इत्यादींना मनाई राहील.**

**२. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणुक मेळावे, सभा, आंदोलने, पुणे दर्शनासारख्या सहली, देशांतर्गत व परदेशी सहली इत्यादी यांचे आयोजन तसेच अत्यावश्यक विषयाखेरीज इतर शासकीय बैठकांस मनाई राहील.**

**३. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात असणा-या दुकाने/सेवा आस्थापना, उपहारगृहे/खादयगृहे/ खानावळ, शॉपींग कॉप्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब, क्रिडांगणे, मैदाने ,जलतरण तलाव, उदयाने, सिनेमागृहे, नाटयगृहे, शाळा, महाविदयालये, खाजगी शिकवणी वर्ग ,व्यायामशाळा, संग्रहालये, व्हिडीओ पॉर्लर, ऑनलाईन लॉटरी सेंटर इत्यादी बंद राहतील.**

**४. पुणे जिल्हयातील सर्व परमिट रुम, बिअरबार दि.३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्यात येत आहे.**

**५. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.**

Scanned with CamScanner

## सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत.

१. शासकीय /निमशासकीय कार्यालये, सरकारी महामंडळाचे उपक्रम/आस्थापना
२. अत्यावश्यक सेवेतील व्यक्ती , रुग्णालये, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, दवाखाने
३. सर्व प्रकारचे वैदयकिय (ॲलोपथी, आयुर्वेदिक, होमिओपथी इत्यादी ) नर्सिंग कॉलेज
४. रेल्वे स्टेशन, एस.टी.स्टॅण्ड, महानगर परिवहन थांबे व स्थानके , विमानतळ व रिक्षा थांबे इत्यादी
५. अंत्यविधी
६. अत्यावश्यक किराणा सामान, दुध/दुग्धोत्पादने , फळे व भाजीपाला, औषधालये, जीवनावश्यक वस्तु विक्री/वितरीत करण्यास परवानगी राहील.
७. सर्व हॉटेल/लॉज यांना तेथे वास्तव्यास असणा-या ग्राहकांना आरोग्य विषयक आवश्यक ती खबरदारी घेवुन रेस्टॉरंटमध्ये खादयपदार्थ बनवुन देण्यास परवानगी राहील.
८. विदयार्थ्यासाठी खानावळ तसेच महाविदयालय/वस्तीगृह यामधील कॅन्टींग /मेस (केवळ परिक्षार्थी)
९. इ.१० वी व इ.१२ वी तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडुन घेण्यात येणा-या सर्व स्पर्धा परिक्षा, विदयापीठ/विश्व विदयालयाच्या परिक्षा देणारे विदयार्थी व संबंधित शैक्षणिक काम पाहणारी व्यक्ती.
१०. ज्या आस्थापना (उदा.माहिती व तंत्रज्ञान उदयोग) ज्यांच्याकडे देश व परदेशातील अति महत्वाच्या ( Critical—National & International Infrastructure) उपक्रमांची जबाबदारी आहे व सदर आस्थापना बंद राहिल्याने अशा उपक्रमांच्या प्रक्रियेला बाधा येवु शकते असे सर्व संबंधित उपक्रम कार्यान्वित राहु शकतील. ( परंतु यादृष्टीने सदर आस्थापना कार्यरत ठेवण्याच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विशेषरित्या कळविणे बंधनकारक आहे)
११. प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके , टिव्ही न्युज चॅनेल इत्यादी) कार्यालय चालु राहतील.

या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

1. सर्व विभाग प्रमुख----------------------------

प्रत-

1. मा. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन,महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
3. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग , मंत्रालय मुंबई यांजकडे
4. आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका
5. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड , पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
6. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,
7. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे

Scanned with CamScanner